जा.क्र.:माध्य-३/प्रथम मान्यता/पुणे
विभाग/१९९
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे - १. यांचे कार्यालय.
दिनांक : 24 MAR 1994

प्रति,

शिक्षणाधिकारी [माध्यमिक],
जिल्हा परिषद, ---पुणे---.

विषय - प्रथम मान्यता
न्यु इंग्लिश स्कूल कुरवंडी , ता आंबेगाव जि. पुणे

संदर्भ - आपले पत्र जा. क्र. शिक्षण /माध्य/ह-४ /९३-९४
दि. ३१/१/९४

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये ~~स्वत शिक्षण संस्था सातारा~~ ------------------- संस्थेच्या मराठी -------- माध्यमिक शाळेच्या इ. ८वी/ ९वी /१०वी च्या वर्गास सन १९९२ - १९९३ या शैक्षणिक वर्षासाठी जुन १९९२ पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्यमिक] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याचाही अहवाल प्रस्तावा सोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिकदृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी आधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित वर्ग उपलब्ध करुन द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करुन द्यावी.
८] वाढीव फीचे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कडून मंजूर करुन घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०] कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३]
१४]

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे - १

प्रत :- मुख्याध्यापक,
न्यु इंग्लिश स्कूल कुरवंडी ता. आंबेगाव